Mrs. Lakshmi Sachin Rawat Guarantors: 1. Mrs. Saraswati Shekhar Mukan 2. Mr. Vijay Shekhar Palan Total outstanding loan: Rs.49,64,352/- (As on 31/10/2026 + further interest and other charges)	Room No. 07, ACME Enclave, 2-A, Co-operative Housing Society, Patel Nagar, Link Road, Malad (West), Mumbai – 400064. Area: approximately 19.54 sq. m. (210.25 sq. ft.). CTS No. 1195/1212.	47,00,000/-

TERMS AND CONDITIONS
1. The property will be sold on an "AS IS WHERE IS" and "WHATEVER THERE IS" basis.
2. Tender forms along with the terms and conditions of sale will be available at the Head Office from 06/11/2026 to 14/12/2026, excluding Sundays, between 10:00 a.m. and 6:00 p.m. The tender form fee is Rs.100/- plus 18% GST.
3. Duly filled-in and signed sealed tender forms, containing the bidder's address and contact number, shall be submitted along with a Demand Draft/Pay Order in favour of **"Samarth Sahakari Patpedhi Maryadit",** or through NEFT/RTGS as mentioned below: Bank Name: Apna Sahakari Bank Ltd., Andheri (West) A/c No.: 007014100000262 IFSC Code: ASBL0000007 EMD: 4,70,000/- The required documents such as Aadhaar Card, PAN Card, Electricity Bill, Rent Agreement, etc. shall be submitted at the Head Office on or before 14/12/2026, by 5:00 p.m.

Reserve Price	47,00,000/-	Earnest Money Deposite (EMD)	4,70,000/-	Bid Increase Amount	1,00,000/-

4. The property will be available for inspection on 13/11/2026 from 11:00 a.m. to 5:00 p.m. Inspection may also be arranged on request.
5. The sealed envelope should clearly bear the words: "Mrs. Lakshmi Sachin Rawat – Property Sale Tender"
6. The sealed tenders received will be opened on Tuesday, 16/12/2026 at 11:00 a.m. at the Head Office in the presence of the tenderers/bidders. The highest bidder may be declared as the successful purchaser. However, if the tender envelopes cannot be opened due to unavoidable circumstances, the next date of opening will be communicated by the Recovery Officer and the tenders will be opened in their presence.
7. The successful/highest bidder shall pay 15% of the bid amount On 16/12/2026 and the remaining 75% amount within one month, i.e. by 15/01/2027 Failing this, the tender/bid and the amount deposited may be forfeited.
8. If the bid is not successful, the EMD amount will be refunded. No bid below the upset price will be accepted.
9. After obtaining the tender form, the tenderer/bidder shall make enquiries regarding property tax, society dues, builder dues, municipal dues, government and semi-government dues, stamp duty, income tax, property tax and other liabilities relating to the property. All such dues shall be borne and paid by the bidder. The Institution/Recovery Officer shall not be responsible for any outstanding dues relating to the property.
10. The Institution/Recovery Officer reserves the right to accept or reject any tender/offer without assigning any reason.
11. This sale notice is also issued to the borrower/guarantors, who may participate in the auction process.

Date: 06/11/2026
Place: Mumbai

Seal

Sd/-
Mr. Yuvraj Mahadev Muluk
Recovery Officer
Samarth Sahakari Patpedhi Maryadit, Mumbai
(Under Section 156 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Rule 107)

'फुलवरा' उलगडणार लावणीच्या ध्यासाची कहाणी



कलावंताच्या स्वप्नपूर्तीच्या प्रवासात सर्वांत महत्त्वाचा असतो तो कलेचा ध्यास! हाच ध्यास कलाकाराला अनेक संघर्षांतून घडवत असतो. कलेप्रती असलेले समर्पण आणि निष्ठा यांची अनुभूती देणारा झी स्टुडिओजच्या आगामी 'फुलवरा' चित्रपटाचा अस्सल बावनकशी टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'घुंगरू पायाला नाही गं, काळजाला बांधून नाचावं!' हा लावणीच्या समर्पणाचा मंत्र सांगणारा चित्रपट १४ जानेवारी २०२७ रोजी मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार आहे.

झी स्टुडिओज आणि अथांश कम्युनिकेशन्स निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन रवी जाधव यांनी केले आहे. चित्रपटाच्या घोषणेपासूनच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, कलाकार कोण असणार, संगीत कसे असेल आणि लावणीच्या पार्श्वभूमीवर कोणती कथा उलगडणार, याबाबत चर्चा सुरू आहे.

टीझरमध्ये कोणत्याही कलाकाराचा चेहरा दाखवण्यात आलेला नाही. त्याऐवजी घुंगरू बांधलेले पाय आणि त्यांच्या संघर्षमय प्रवासाची प्रतीकात्मक दृश्ये लक्ष वेधून घेतात. कुठे जल्लोष, कुठे अडखळणारी पावले, तर कुठे रक्ताने माखलेले पाय दिसतात. देवीला फुलवरा अर्पण करणारे हात, ढोलकीवर थाप मारणारी बोटे, तबल्यावर ताल धरणारे हात आणि तालावर थिरकणारे पाय अशा दृश्यांतून लावणी कलावंतांचे कष्ट, जिद्द आणि समर्पण अधोरेखित होते. हर्ष-विजय या संगीतकार जोडीचे संगीत टीझरला अधिक प्रभावी बनवते.

सुमारे सतरा वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'नटरंग' चित्रपटाने लावणीसह मराठी चित्रपटसृष्टीला नवी ऊर्जा दिली होती. आता पुन्हा एकदा लावणी आणि तमाशाच्या विश्वाचा अनुभव 'फुलवरा'मधून प्रेक्षकांना मिळणार आहे. मात्र, केवळ रंगमंचावरील झगमगाट न दाखवता त्यामागील मेहनत, कलाकारांची धडपड आणि कलेशी जोडलेले भावविश्व उलगडण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे.

दिग्दर्शक रवी जाधव यांच्या मते, लावणीच्या ठेक्यामागे वर्षानुवर्षांची मेहनत आणि कलेशी असलेली अतूट बांधिलकी असते. झी स्टुडिओज मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर यांनीही मराठी लोककलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी अधोरेखित केली. 'द फोक आख्यान'मधील हर्ष-विजय या जोडीने चित्रपटाला संगीत दिले असून, ईश्वर ताराबाई अंधारे यांनी कथा, पटकथा, संवाद आणि गीते लिहिली आहेत.

तेजस देऊस्करांचा नवा हॉरर फँटसी चित्रपट!

मराठी चित्रपटसृष्टीत वेगवेगळ्या विषयांवरील प्रयोग सुरू असतानाच आता प्रेक्षकांना भय, कल्पनारम्यता आणि गूढतेचा अनोखा अनुभव देणारा हॉरर फँटसी चित्रपट पाहायला मिळणार आहे. 'बकेट लिस्ट' आणि 'देवमाणूस' या चित्रपटांमधून आपल्या दिग्दर्शनाची वेगळी छाप उमटवणारे तेजस प्रभा विजय देऊस्कर यांच्या आगामी चित्रपटाचा मुहूर्त नुकताच संपन्न झाला. या चित्रपटात सोनाली कुलकर्णी, सुयोग गोऱ्हे आणि रसिका सुनील यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाचे नाव लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

हॉरर आणि फँटसी या दोन वेगळ्या प्रकारांची सांगड घालणाऱ्या या चित्रपटाच्या कथानकाबाबत सध्या गुप्तता राखण्यात आली आहे. त्यामुळे या चित्रपटातून कोणते नवे कथाविश्व प्रेक्षकांसमोर येणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन तेजस प्रभा विजय देऊस्कर यांनी केले आहे. नितीन वैद्य प्रॉडक्शन्स आणि रियान राय मोशन पिक्चर्स (यूके) यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपटाची निर्मिती होत आहे. नितीन प्रकाश वैद्य आणि जितेंद्र राय हे चित्रपटाचे निर्माते आहेत.

निर्माते नितीन प्रकाश वैद्य यांनीही या वेगळ्या विषयावरील चित्रपटाबद्दल विश्वास व्यक्त केला. तर निर्माते जितेंद्र राय यांनी सोनाली कुलकर्णी, सुयोग गोऱ्हे आणि रसिका सुनील यांसारख्या प्रतिभावान कलाकारांच्या सहभागाबद्दल आनंद व्यक्त केला.

मुहूर्तासह चित्रपटाच्या निर्मिती प्रवासाला सुरुवात झाली असून, नाव आणि कथानकाच्या घोषणेकडे आता प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.



> प्रत्येक चित्रपटातून प्रेक्षकांना काहीतरी वेगळा अनुभव देण्याचा माझा प्रयत्न असतो. या चित्रपटाची संकल्पना आणि त्यातून आकाराला येणारे कथाविश्व मला विशेष भावले. हॉरर फँटसी हा प्रकार वास्तवाच्या पलीकडे जाऊन अनेक शक्यता तपासण्याची संधी देतो. केवळ भयाचा अनुभव न देता प्रेक्षकांना एका वेगळ्याच विश्वात घेऊन जाण्याचा आमचा प्रयत्न आहे.
>
> - **तेजस देऊस्कर**, दिग्दर्शक

'जय श्री राम'मधून उलगडणार थरारक घटना!

अयोध्येत प्रभू श्रीरामांचे भव्य मंदिर उभे राहिल्यानंतर पाकिस्तानमध्ये नेमकी कोणती घटना घडली? या घटनेमागचे सत्य काय आहे? अशा अनेक प्रश्नांची उत्सुकता वाढवणारा 'जय श्री राम' हा भव्य मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वेगळ्या विषयाची लक्षवेधक मांडणी आणि भव्य निर्मितीमूल्ये यांची सांगड घालणाऱ्या या चित्रपटाच्या चित्रीकरणाला नुकतीच सुरुवात झाली आहे.

'सेव्हन ओशन स्टुडिओज' आणि 'अमोल कागणे स्टुडिओ प्रॉडक्शन' यांच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाची निर्मिती होत आहे. राम खाटमोडे आणि सागर पाठक हे चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळत आहेत, तर विनोद वणवे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम पाहत आहेत.

मराठी, बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील अनुभवी आणि दमदार कलाकारांची फळी हे या चित्रपटाचे विशेष आकर्षण असणार आहे. वेगळा विषय, भव्य निर्मितीमूल्ये आणि नामवंत कलाकारांचा सहभाग यामुळे चित्रपटाबाबतची उत्सुकता वाढली आहे.

अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या उभारणीनंतर पाकिस्तानमध्ये घडलेली एक अनपेक्षित आणि धक्कादायक घटना या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर मांडण्यात येणार आहे. नेमकी ती घटना कोणती होती? तिचे कोणते अनपेक्षित पैलू प्रेक्षकांसमोर येणार? तसेच या घटनेला कथानकात कोणते नाट्यमय वळण मिळणार? या प्रश्नांची उत्तरे चित्रपटातून मिळणार आहेत.

चित्रीकरणाला सुरुवात झाल्याने 'जय श्री राम'च्या निर्मिती प्रवासाला वेग आला आहे.

कारच्या धडकेत चिमुकल्याचा मृत्यू

मेघा कुचिक/मुंबई

बोरिवली पश्चिम येथे बुधवारी रात्री आईसोबत रस्त्यावरून ट्रायसिकलवरून जात असलेल्या अडीच वर्षांच्या चिमुरड्याला कारने धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. कृष्णिव मांडविया असे मृत मुलाचे नाव आहे. या प्रकरणी आरोपी डॉ. समीर पारेख (४८) यांना पोलिसांनी अटक केली. मात्र, गुरुवारी त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री कृष्णिवची आई रिद्धी जेवणानंतर त्याला ट्रायसिकलवरून फिरवण्यासाठी घेऊन गेली होती. रात्री पावणेदहाच्या सुमारास ते घरी परतत असताना रिद्धी रस्ता ओलांडत होत्या.भरधाव एसयूव्हीने यू-टर्न घेताना कृष्णिवच्या ट्रायसिकलला जोरदार धडक दिली. यात रिद्धी रस्त्यावर फेकल्या गेल्या, तर ट्रायसिकल किया कारच्या दिशेने फरफटत गेली.

आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहा

राज्यमंत्री योगेश कदम यांची प्रमुख उपस्थिती; रविंद्र फाटक यांचे आवाहन

वसई : शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार वसई तालुका शिवसेनेच्या वतीने आयोजित 'कार्यकर्ता संवाद दौरा' मेळावा राज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी त्यांनी शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधत संघटनात्मक बांधणी, आगामी राजकीय आव्हाने तसेच जनसेवेच्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी आणि धर्मवीर स्व. आनंद दिघे यांच्या शिकवणुकीने प्रेरित झालेली जनसेवेची चळवळ आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. तळागाळातील प्रत्येक कार्यकर्ता हीच पक्षाची खरी ताकद असून,



संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने आणि जोमाने काम करावे, असे आवाहन करण्यात आले.

शिवसेनेचे उपनेते आमदार रवींद्र फाटक यांनी आपल्या जोशपूर्ण भाषणातून शिवसैनिकांना आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. जनतेचे प्रश्न आणि समस्या प्रशासनाच्या दरबारी मांडून त्या सोडविण्यासाठी शिवसेनेचे मंत्री आणि आमदार यांच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

या मेळाव्याला आमदार राजेंद्र गावित, संपर्कप्रमुख पांडुरंग पाटील, जिल्हाप्रमुख निलेश तेंडोलकर, नगरसेविका गटनेत्या हेमलता सिंह, जिल्हा सचिव अतुल पाटील, तालुकाप्रमुख सुदेश चौधरी, भरत देवधरे, शैलेश जाधव, विशाल पाटील, अक्षय इंडप, निलेश तेलंगे, धर्मेंद्र जगताप, विक्रांत म्हात्रे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकनाथ शिंदे यांना 'सनातन मार्तंड' पुरस्कार

वाराणसी : सत्तेपेक्षा सिद्धांत मोठा, सत्तेपेक्षा सत्य मोठे आणि अधिकारापेक्षा धर्म व कर्तव्य श्रेष्ठ आहे. सनातन धर्म, संत समाज, भारतीय संस्कृती आणि धर्मरक्षणासाठी शरीरातील रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत समर्पित राहीन, असा ठाम निर्धार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय संत समिती विविध धार्मिक संस्थांचे पदाधिकारी, महामंडलेश्वर आणि गंगा महासभेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शिंदे यांचा 'सनातन मार्तंड पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. यावेळी त्यांना 'धर्मध्वजाधारक' ही उपाधी देखील सन्मानपूर्वक बहाल करण्यात आली.

वाराणसी येथील रुद्राक्ष कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ३ ते ५ नोव्हेंबरदरम्यान आयोजित 'संस्कृती संसद २०२६' मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. देशभरातून हजारो संत-महंत, धर्माचार्य, विचारवंत आणि युवक या तीन दिवसीय सांस्कृतिक महाकुंभात सहभागी झाले होते. यावेळी शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारून उपस्थित साधू संतावर पुष्पवृष्टी करून त्यांना वंदन केले. भारतीय संत समिती विविध धार्मिक संस्थांचे पदाधिकाऱ्यांनी केलेला हा सन्मान हा माझा एकट्याचा सन्मान नसून महाराष्ट्रातील जनतेचा आहे.

मीरा-भाईंदरमध्ये मिनी क्लस्टर धोरणाला शासनाची मंजुरी!

जुन्या आणि धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

भाईंदर : मीरा-भाईंदर शहरातील शेकडो जुन्या आणि धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला चालना देणाऱ्या मिनी क्लस्टर धोरणाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो कुटुंबांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. नव्या धोरणानुसार पुनर्विकासासाठीची किमान जागेची अट १० हजार चौरस मीटरवरून २ हजार ५०० चौरस मीटर करण्यात आली असून, रस्त्याच्या रुंदीची अटही १८ मीटरवरून १२ मीटर करण्यात आली आहे. त्यामुळे आता तीन धोकादायक इमारतींचा एकत्रित पुनर्विकास शक्य होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मीरा-भाईंदर शहरात अनेक वर्षांपूर्वी दाटीवाटीने बांधण्यात आलेल्या शेकडो इमारती आज जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत आहेत. काही गृहसंस्थांच्या जमिनी अद्याप सोसायट्यांच्या नावावर नसल्याने, तर काही ठिकाणी मंजूर आराखड्यापेक्षा अधिक बांधकाम झाल्याने पुनर्विकासात अडथळे निर्माण झाले आहेत. अरुंद रस्ते, चटईक्षेत्राचा वापर आणि मालकी हक्कासंबंधीच्या अडचणींमुळे हजारो कुटुंबांचा पुनर्विकास रखडला होता. यापूर्वीच्या क्लस्टर धोरणातील मोठ्या क्षेत्रफळाची अट आणि अनेक इमारतींचा सामूहिक विकास करण्याची आवश्यकता यामुळेही रहिवाशांना अडचणी येत होत्या.

भाईंदर पश्चिम येथील राणी सती मार्गावरील पाच जुन्या इमारतींच्या रहिवाशांनी पुनर्विकासातील अडचणी मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासमोर मांडल्या होत्या. या इमारतींमधील १७८ कुटुंबे पुनर्विकासाच्या प्रश्नामुळे अडचणीत होती. त्यापैकी एका इमारतीवर तोडक कारवाईही करण्यात आली होती. या प्रकरणानंतर मिनी क्लस्टर योजना लागू करण्यासाठी आणि पुनर्विकासाच्या अटी शिथिल करण्यासाठी प्रयत्नांना गती मिळाली.

१८ नोव्हेंबर २०२५ रोजी मंत्री सरनाईक यांनी मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक घेऊन १० हजार चौरस मीटरची जाचक अट रद्द करण्याचे निर्देश नगरविकास विभागाला दिले होते. यासंदर्भात उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतही बैठका झाल्या. त्यानंतर १२ डिसेंबर २०२५ रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध करून नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या. आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ३ नोव्हेंबर २०२६ रोजी शासनाने या धोरणाला अंतिम मंजुरी दिली.

मिनी क्लस्टर धोरणामुळे जुन्या इमारतींच्या पुनर्विकासातील अनेक अडथळे दूर होण्याची अपेक्षा आहे. यामुळे रहिवाशांना हक्काचे घर मिळण्याचा मार्ग सुकर होण्याबरोबरच विकासकांनाही प्रकल्प राबविणे शक्य होणार आहे.भाईंदर पश्चिम महिला संघटक सरिता शिंदे यांनी या निर्णयाचे स्वागत केले.

स्थानिक पातळीवरील विरोध आणि प्रशासकीय अडथळ्यांवर मात करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री प्रताप सरनाईक यांनी नागरिकांच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

पुनर्विकासाच्या अटींमध्ये महत्त्वाचे बदल

नव्या धोरणानुसार किमान क्षेत्रफळाची अट १० हजारांवरून २,५०० चौरस मीटर करण्यात आली आहे. यापूर्वी पाच धोकादायक इमारती एकत्र येणे आवश्यक होते; आता तीन इमारती एकत्र आल्यासही पुनर्विकास शक्य होणार आहे. रस्त्याची रुंदी १८ मीटरऐवजी १२ मीटर आवश्यक असेल. तसेच, आवश्यक क्षेत्रावर ०.५० प्रोत्साहन एफएसआय किंवा सरसकट चार एफएसआय, यापैकी जो अधिक असेल तो अनुज्ञेय ठेवण्यात आला आहे. त्यामुळे लहान भूखंडांवरील जुन्या वस्त्यांच्या पुनर्विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय
प्रशासकीय इमारत, ९वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रा (पू), मुंबई-४०० ०५१.
दूरध्वनी क्र. ०२२-२६५१ ०१३६ ईमेल: sdomsdest@gmail.com
क्र. आरटीएस/संकिर्ण/एसआर-६५/२०२६

सुनावणीची जाहीर नोटीस

मे. एस.एम.कन्स्ट्रक्शन
द्वारा पार्टनर **श्री. मोहम्मद इम्तीयाज खान**
जी-१, लेक व्हिव अपार्टमेंट, देना बँक समोर, मरोळ व्हिलेज रोड,
अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०५९ ....अपिलार्थी
विरूद्ध
१) तहसीलदार अंधेरी
२) मंडळ अधिकारी मरोळ
३) तलाठी सझा मरोळ,
४) श्री. गुल्हामिद आय. खान
प्लॉट नं. १, बि.नं.१, ४था मजला, मरोळ मरोशी रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००५९.
५) श्री. सुधीर अस्थाना
६) श्रीमती मलीका रामस्वामी अस्थाना
३०१, शिव मुक्ती, मरोळ मरोशी रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००५९.
७) श्री. विल्यम जॉन लुईस
विल्यम व्हिल्ला, कुटोनवाला बाग, ए.के.रोड, दिंबली नाका, लायन्स क्लब समोर, जे.बी.नगर, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९. ....प्रतिवादी

विषय:- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये दाखल अपिल

अपिलार्थी यांनी मौजे मरोळ, ता. अंधेरी येथील स.नं. ८अ, हि.क्र.२५ या जमीन मिळकत संदर्भात फेरफार क्र. २९६२ दिनांक २१/०१/२०२५ विरूद्ध या न्यायालयात अपील दाखल केलेल आहे. सोबत विलंबमाफीचा अर्ज सादर केला आहे.

उपरोक्त दिवशी आपण स्वत: किंवा प्राधिकृत वकीलामार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित रहावे. वरील तारखेस आपण हजर न राहिल्यास किंवा आपणामार्फत लेखी अथवा तोंडी जबाब/युक्तीवाद सादर न केल्यास आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरून कागदपत्रांच्या गुणवत्तेनुसार अपिल प्रकरणात आदेश पारीत करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी
(प्रशांत ढगे)
उपविभागीय अधिकारी
मुंबई पश्चिम उपनगर
ठिकाण : मुंबई
दिनांक: २९/१०/२०२६

मध्य रेल्वे

व्हील सेट अर्थिंग उपकरणाच्या सुधारणेचे काम

खुली निविदा सूचना क्र. सीआर-एमयूएम०एमईसीएच(एमझेडसीओ)/२५/२०२६/आरटी, दिनांकित ०३.११.२०२६. कामाचे नाव: आरसीएफ सीएआय क्र.: ईडी/सीएआय/०३१ दिनांकित २०.०३.२०२४ नुसार मुंबई विभागाच्या एमझेडएन कोचिंग डेपोच्या एलएचबी डब्यांमध्ये व्हील सेट अर्थिंग उपकरणाच्या (डब्ल्यूएसईई) सुधारणेचे काम. **कामाची अंदाजे किंमत:** रु. ६,२०,२०८/- (रुपये सहा लाख वीस हजार दोनशे आठ फक्त). **इसारा रक्कम:** रु. १२,४००/- (रुपये बारा हजार चारशे फक्त). **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** २५.११.२०२६ रोजी १५:०० वा. निविदा केवळ **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाद्वारे ई-निविदा स्वरूपात स्वीकारल्या जातील. निविदा दस्तऐवज संकेतस्थळावर उपलब्ध आहे. AK-723

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय अपराध आहे.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that Share Certificate No. 211 for ordinary shares bearing Distinctive Nos. from 1051 to 1055 dt. 1st January 1985 of Kumari Jethi T. Sipahimalani Chs., Mori Road, Mahim, Mumbai - 400 016 in the name of Shri. T. M. Shahani, Flat 7/17 has been reported lost / misplaced and an application has been made to the society for issue of duplicate share certificate.

The society hereby invites claims or objections (in writing) for issuance of duplicate share certificate within the period of 15 (Fifteen) days from the date of publication of this notice. If no claims/objections are received during this period the society shall be free to issue duplicate share certificate.

For and on behalf of
Kumari Jethi T. Sipahimalani Chs. Ltd.
Place : Mumbai Sd/-
Date : 6/11/2026 Hon. Secretary

asREC (India) Limited

नोंदणीकृत कार्यालय: सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, इमारत क्र. २, युनिट क्र. २०१-२००ए आणि २०२-२००बी, तळमजला, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी, मुंबई - ४०००९३
सीआयएन: यू६७१००एमएच२००३जीओआय४३९९१, दूरध्वनी क्र.: ०२२-६१३८ ७०००

ई-लिलावाद्वारे अनुत्पादक वित्तीय मत्तांची विक्री
(स्विस चॅलेंज पद्धती अंतर्गत)

एएसआरईसी (इंडिया) लि., स्विस चॅलेंज पद्धती (एससीएम) अंतर्गत ३ खात्यांसाठी आपल्या अनुत्पादक वित्तीय मत्तांची विक्री करण्याच्या प्रक्रियेत आहे. प्रस्तावित विक्री ही मास्टर डायरेक्शन-रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (कर्ज जोखमींचे हस्तांतरण) निर्देश आणि लागू कायद्यानुसार आयोजित करण्यात येईल. एएसआरईसी (इंडिया) लिमिटेड इच्छुक मत्ता पुनर्रचना कंपन्या (एआरसी)/एनबीएफसी यांच्याकडून प्रस्तावित विक्रीमध्ये बोली प्रक्रियेद्वारे सहभागी होण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रित करीत आहे, जी ई-लिलावाद्वारे आयोजित करण्यात येईल. बोली प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक संस्था ''स्वारस्य अभिव्यक्ती'' सादर करून आपले स्वारस्य व्यक्त करू शकतात. हे लक्षात घ्यावे की प्रस्तावित विक्रीमध्ये सहभागी होण्यास इच्छुक संस्थांनी गोपनीयता करार निष्पादित करणे आवश्यक आहे. तथापि, कृपया नोंद घ्यावी की हस्तांतरण हे एएसआरईसी (इंडिया) लिमिटेडच्या सक्षम प्राधिकरणाच्या अंतिम मंजुरीच्या अधीन असेल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) जारी केलेल्या लागू नियमांच्या अधीन असेल.

विक्री ही ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे त्या आधारावर'', ''जे काही आहे त्या आधारावर'' आणि ''विनाअवलंब'' या तत्त्वांवर करण्यात येईल. पात्र बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी स्वारस्य अभिव्यक्तीद्वारे सहभागी होण्याची आपली इच्छा कळविण्याची विनंती करण्यात येते.

वेळेचे परिशिष्ट खाली दिलेले आहे, कृपया त्याचे पालन करण्यात यावे, कारण परिशिष्टामध्ये यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

अनु. क्र.	तपशील	अंतिम/सूचक तारीख
१	स्वारस्य अभिव्यक्ती (ईओआय)/गोपनीयता करार (एनडीए) सादर करणे आणि योग्य तपासणी प्रक्रिया पूर्ण करणे.	२५.११.२०२६
२	ए. बंधनकारक बोली सादर करणे.	३०.११.२०२६
	बी. प्रतिस्पर्धी बोलीदारांमध्ये ई-बोली प्रक्रिया/मूळ बोलीदारास त्याच बोलीशी जुळविण्याची संधी देण्यासह सर्वोच्च बोलीदाराची घोषणा.	०१.१२.२०२६ (स. ११.०० वा. सुरू होणार) परस्पर बोली प्रक्रियेसाठी वाढीव वेळ ५ मिनिटे)
	सी. यशस्वी बोलीदाराची घोषणा.	०१.१२.२०२६ (सायं. ५.०० वा. पर्यंत)
३	विजेत्या बोलीदाराने संपूर्ण बोलीची रक्कम पूर्णपणे भरण्याची अंतिम तारीख आणि वेळ.	०४.१२.२०२६ (सायं. ४.०० वा. पर्यंत)

बोली प्रक्रियेत सहभागी होण्याच्या पात्रतेच्या तपशीलांसाठी आणि स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी, कृपया आमच्या **www.asrecindia.co.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच, कोणत्याही प्रश्नांसाठी/स्पष्टीकरणासाठी, कृपया नियुक्त अधिकारी म्हणजेच श्री. ए. जगन्नाथ राव **(jaganathrao@asrecindia.co.in)** आणि श्री. हरिदास मेनन (haridasmenon@asrecindia.co.in) यांच्याशी संपर्क साधावा.

दिनांक : ०५.११.२०२६ **सही/-**
ठिकाण : मुंबई **प्राधिकृत अधिकारी, एएसआरईसी (इंडिया) लि.**

जीपीके-जे ६-७५,०००-६.९८ **एफएसीआयव्ही क्र. ६३०८/२०२६**
जीआर., एच.डी.[क्र.४३९८, दिनांकित ३-७-१६] **दिनांक : ६/१०/२०२६**
सीएफए ४९५२/२०२६ प्रकाशनासाठी निबंधक (न्यायिक-II) यांच्या [एसपीएल.-एच.सी., ए.एस., सी.डी. १६-ई
दिनांकित २७/०८/२०२६ च्या आदेशानुसार परवानगी देण्यात आली आहे.

०५/११/२०२६ रोजी देय
प्रकाशन सूचना
न्यायालयाचा दिनांकित ०५/०७/२०१६ चा आदेश
मुंबई येथील उच्च न्यायालयात
प्रथम अपील क्र. **१०३२ सन २०१६**
मूळ हुकूमनाम्यातून
लघुवाद दावा क्र. २७४ सन १९६८ मधील निष्पादन अर्ज क्र. २५ सन २००४ मध्ये
चेंबर समन्स क्र. ३७४ सन २०१०
मुंबई येथील शहर दिवाणी न्यायालयात.

द बोर्ड ऑफ ट्रस्टीज ऑफ द पोर्ट ऑफ बॉम्बे ...अपीलकर्ता
वकिलांमार्फत : **द लॉ पॉइंट**
विरुद्ध
१ए. सुमनलाल लालजी कंपनी आणि इतर. ...प्रतिवादी
प्रति,
प्रतिवादी क्र. १ए : सुमनलाल लालजी कंपनी
पत्ता : द्वारा मे. कार ॲलन अँड कं. ८२बी, इल्बेट रोड, कलकत्ता-६०
प्रतिवादी क्र. १बी : अमृतलाल लालजी कंपनी
पत्ता : ५३, गिरीश मुखर्जी रोड, कलकत्ता

याद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अपीलकर्ता द बोर्ड ऑफ ट्रस्टीज ऑफ द पोर्ट ऑफ बॉम्बे यांनी **मुंबई येथील शहर दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या** हुकूमनाम्याविरुद्ध प्रथम अपील दाखल केले असून, सदर अपील या न्यायालयात नोंदणीकृत करण्यात आले आहे आणि या न्यायालयाने असा आदेश दिला आहे की, सदर अपीलाची सुनावणी या न्यायालयात ०५/११/२०२६ रोजी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही दिवशी, जो या न्यायालयास सोयीस्कर वाटेल, घेण्यात येईल.

जर तुम्ही स्वतः, तुमचे वकील किंवा तुमच्या वतीने कार्य करण्यास कायद्याने अधिकृत असलेली कोणतीही व्यक्ती या प्रथम अपीलात तुमच्या वतीने उपस्थित राहिली नाही, तर तुमच्या अनुपस्थितीत सदर अपीलाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

साक्षी : **श्री. डी.एच. वाघेला, मुख्य न्यायमूर्ती आणि श्री. रवींद्र व्ही. घुगे (कार्यवाहक)**, मुख्य न्यायमूर्ती, मुंबई येथे उपरोक्त, ०५ जुलै, २०१६ च्या दिवशी आणि २७ ऑगस्ट, २०२६ च्या दिवशी.

न्यायालयाच्या आदेशाने,
उप निबंधक यांच्यासाठी

जाहिर सूचना
मुंबई येथील उच्च न्यायाधिकार न्यायालयात
सामान्य मूळ दिवाणी अधिकारक्षेत्र
दावा क्र. ३२१ सन २०२५

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया ...वादी
विरुद्ध
मोहन मनोहर मुळे आणि इतर. ...प्रतिवादी

आमचे अशील, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (''वादी'') यांच्या वतीने मोहन मनोहर मुळे (''प्रतिवादी क्र. १'') यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त दाव्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने पारित केलेल्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या आदेशात (''आदेश'') नोंदविल्याप्रमाणे, वादीने आपल्या साक्षीदाराच्या मुख्य तपासणीऐवजी शपथपत्र, तसेच कागदपत्रांचे शपथपत्र आणि कागदपत्रांचे संकलन दाखल केले आहे.

दिनांक १३ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे मा. न्यायालयाने वादीस ही जाहिर सूचना प्रकाशित करून प्रतिवादी क्र. १ यांना सूचना बजावण्याची परवानगी दिली आहे.

त्यानुसार, प्रतिवादी क्र. १ यांना याद्वारे मुख्य तपासणीऐवजी दाखल केलेल्या शपथपत्राच्या, कागदपत्रांच्या शपथपत्राच्या आणि कागदपत्रांच्या संकलनाच्या प्रती प्राप्त करण्यासाठी खाली नमूद केलेल्या पत्त्यावर आणि/किंवा संपर्क तपशिलांवर वादीच्या वकिलांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

दिनांक ३० ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे उपरोक्त दावा निर्देशांसाठी दिनांक ११ डिसेंबर, २०२६ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर सूचीबद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्या दिवशी प्रतिवादी क्र. १ स्वतः किंवा त्यांनी योग्यरीत्या सूचना दिलेल्या वकिलामार्फत उपस्थित राहू शकतात.

आज दिनांक ६ नोव्हेंबर, २०२६ रोजी.

सही/-
लिंक लीगल
वादीचे वकील
३०२ - ३०४, तिसरा मजला, रीजेंट चेंबर्स,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
ई-मेल - mustafa.motiwala@dentonslinklegal.com

PRAXIS HOME RETAIL LIMITED
प्रॅक्सिस होम रिटेल लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : दुसरा मजला, नॉलेज हाऊस, श्याम नगर, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड लगत, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ४०००६०
सीआयएन : एल५२१००एमएच२०११पीएलसी२१२८६६
दूरध्वनी : ०२२-४५१८ ४३९९;
संकेतस्थळ : https://praxisretail.hometown.in/; ई-मेल : investorrelations@praxisretail.in

३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेली तिमाही आणि अर्ध वर्षासाठीच्या अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षांचा उतारा

(रु. लाखांमध्ये)

अ. क्र.	तपशील	संपलेली तिमाही		संपलेले अर्धवर्ष
		३०/०९/२०२६	३०/०९/२०२५	३०/०९/२०२६
		अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित
१	परिचालनांमधून एकूण उत्पन्न	२,५०५.०९	२,१२१.७१	५,१६५.१६
२	कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	(१,२८०.१६)	(१,४३५.७४)	(२,३८६.६६)
३	कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) करपूर्व (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबीनंतर)	(१,२८०.१६)	८,१०४.२६	(२,३८६.६६)
४	कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) करोत्तर (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबीनंतर)	(१,२८०.१६)	८,१०४.२६	(२,३८६.६६)
५	कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीतील नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) यांचा समावेश)	(१,२८०.१६)	८,१०४.२६	(२,३८६.६६)
६	समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. ५/- प्रति समभाग)	९,२९०.६१	९,२४५.५३	९,२९०.६१
७	प्रति समभाग उत्पन्न (दर्शनी मूल्य रु. ५/- प्रति समभाग) मूलभूत व सौम्यीकृत (रु.)	(०.६९)	५.२४	(१.२८)

टिप :
१. प्रॅक्सिस होम रिटेल लिमिटेड (''कंपनी'') च्या संचालक मंडळाने (''मंडळ'') गुरुवार, ०५ नोव्हेंबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत, इतर बाबींसह, ३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेली तिमाही आणि अर्ध वर्षासाठी कंपनीचे अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्ष (''वित्तिय निष्कर्ष'') विचारात घेऊन मंजूर केले.
२. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (सुधारित) च्या रेग्युलेशन ४७ च्या अनुपालनात वित्तिय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण आता खाली दिलेल्या क्विक रिस्पॉन्स कोड (''क्यूआर कोड'') द्वारे उपलब्ध आहे आणि ते कंपनीच्या https://praxisretail.hometown.in या संकेतस्थळावर तसेच स्टॉक एक्स्चेंजेस अर्थात बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या संकेतस्थळांवरही प्रकाशित करण्यात आले आहे.

प्रॅक्सिस होम रिटेल लिमिटेडकरिता
सही/-
शाश्वत निगम
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पूर्णवेळ संचालक
डीआयएन : १०२७७६९०
ठिकाण : मुंबई
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०२६